# मुक्काम पोस्ट 'टनेल'



(चित्र - MS Word ClipArt)

माझी मैत्रिण कॅथरिन गेले आठ दिवस हॉस्पिटलमध्ये मुक्काम ठोकून होती. तिच्या मुलाला एरिकला कॅन्सर झाला होता. आठ दिवसांपूर्वी एरिकची प्रकृती गंभीर झाली. त्याला हॉस्पिटलमध्ये हलवावे लागले. तेव्हापासून ती इथेच होती. अहोरात्र एरिकची शुश्रुषा करत होती. जमेल तेव्हा वेटिंग रुममधल्या अंग झोकून देऊन विश्रांती घेण्याचा प्रयत्न करत होती; पण ती खूपच दमून गेली होती. तिला आलेला मानसिक, शारीरिक थकवा मला खूपच जाणवला, तेव्हा मीच तीला घरी जाण्याचा आग्रह केला.

'कॅथरिन, तू घरी जाऊन झोप घेणे आवश्यक आहे. तू जा. मी एरिकला अटेन्ड करीन', असे सांगून मी बळे, बळे तिला घरी जायला राजी केले. कॅथरिनने आपली बॅग आवरली, ओणवून एरिकच्या कपाळाचे चुंबन घेतले व डोळे पुशीतच रुममधून बाहेर पडली. तिला लिफ्टपर्यंत पोचवून मी एरिकच्या रुममध्ये आले व त्याच्या बिछान्याजवळ ठेवलेल्या खुर्चीवर बसले. सहजच माझे लक्ष त्या रुममध्ये असलेल्या दुसऱ्या कॉटकडे गेले. २४—२५ वर्षे वयाचा एक मुलगा, कॉटवर डोळे मिटून शांत पडला होता. सोनेरी केस, सोनेरी भुवया, सोनेरी पापण्या व गालावर तिळांची गर्दी, मात्र आजारपणामुळे त्याचा गोरा रंग अधिकच फिकट झाला होता. गेले आठ दिवस मी रोजच एरिकला भेटायला येते होते; पण लक्षपूर्वक त्या मुलाकडे पाहण्याइतपत वेळ मिळाला नव्हता. त्याला नियमितपणे भेटायला येणारेही कुणी दिसले नव्हते. या मुलाला भेटायला कुणी का बरे येत नसेल? हा प्रश्न मनात आला. इतक्यात एक सुंदर, तरुण अमेरिकन मुलगी हातात भला मोठा बॉक्स व फुलांचा गुच्छ घेऊन आत आली. हळुवारपणे त्या मुलाला स्पर्श करीत म्हणाली, 'हाय जेसी'. त्या मुलाचे नाव जेसी होते तर. जेसीने डोळे उघडले. स्मितहास्य करुन त्या मुलीला अभिवादन करीत तो उठून बसला. माझी उपस्थिती जाणवताच मलाही हॅलो म्हणत अधीरतेने त्याने विचारले, 'माझ्या बाळांना आणलंस? रिकी नाही आला?' माझी उत्सुकता वाढली. रुमचा दरवाजा अर्धवट बंद करित ती म्हणाली, 'हॉस्पिटलच्या समोर जो पार्क आहे तिथे रिकी 'मम्मी' ला घेऊन थांबलाय. सिक्युरिटी गार्डची नजर चुकवून मी तुझ्या बाळांना घेऊन आले आहे. लवकर भेटून घे' असे म्हणत तिने घाईघाईने बॉक्स उघडला. बॉक्समध्ये सहा गोजिरवाणी मांजरीची पिल्ले होती. प्रत्येक पिल्लाच्या अंगावरुन मायेने हात फिरवीत जेसी भरल्या आवाजात म्हणाला, 'थँक्यू तारा, तू माझ्यासाठी

केवढे धाडस केलेस.' 'मी पार्कमध्ये जाऊन रिकीच्या मम्मीजवळ थांबते व रिकी तुला भेटायला येईल. तुला काही हवे असेल तर सांग मी रिकीच्या हाती पाठवते.' 'नको तारा, मला काही नको. तुला कल्पना आहे मला हॉस्पिटलमध्ये जे बेचव जेवण मिळते तेच खाण्याची सक्त ताकीद आहे. आजचे एखादे वर्तमानपत्र पाठव', असे म्हणत जेसीने उशीखालचे पाकीट काढले व त्यातून वीस डॉलर्स काढून ताराच्या हातात देत म्हटले, 'जाताना, प्लीज माझ्या बाळासाठी कॅट फुडचे कॅन्स घेऊन जा. तुझ्या या उपकारांची मी नेहमी जाणीव ठेवेन. थँक्यु अगेन.' जेसीचा निरोप घेऊन बॉक्स सांभाळीत तारा लगबगीने निघून गेली. काही वेळाने रिकी आला. अशक्त, वय पन्नाशीच्या आसपास, गोऱ्यापान चेहऱ्यावर सुरकुत्या व खूप काही सहन केल्याच्या खूणा. जेसीच्या प्रकृतीची चौकशी करीत त्याने पिशवीतून वर्तमानपत्र काढून जेसीच्या हातात दिले व त्याच बॅगेतून टॉवेल, कपडे व साबणाची पेटी. 'जेसी तुझ्या बाथरुममध्ये आंघोळ करतो रे. तुझ्या रुममधल्या सुखसोयींचा मला हेवा वाटतोय.' असे म्हणत तो बाथरुममध्ये घुसला.

माझे कुतूहल आणखीनच वाढले. रिकीची मम्मी त्याच्याबरोबर जेसीला भेटायला का आली नसेल? रिकी आंघोळीसाठी हॉस्पिटलमधल्या बाथरुमचा उपयोग करतो याचा अर्थ त्याच्या घरी बाथरुमची सोय नसेल का? मांजरीची पिल्ले सांभाळणारी तारा जेसीची कोण असेल? अनेक प्रश्नांची उत्तरे मिळवण्याची जिज्ञासा अनिवार झाली. जेसी किंवा रिकीला कसे विचारावे या विचारात होते तोच मनसोक्त आंघोळ करुन, स्वच्छ कपडे घालून, ताजातवाना होऊन, भांग पाडीत रिकी बाहेर आला व हसत म्हणाला, 'तुला भेटायला येण्याचा हा सर्वात मोठा फायदा'. जेसीच्या बिछान्याजवळच्या खुर्चीवर बस रिकीने त्याचा हात हातात घेतला व बोलू लागला, 'जेसी लवकरच मी आपला बोगदा सोडून माझ्या खेडेगावी जायचे ठरविले आहे. मम्मीसाठी हे करण्यावाचून मला दुसरा उपायही उरला नाही. ती म्हातारी झालीये व मी तरी कुठे तरुण राहिलोय. गेली वीस वर्षे माझे तारुण्य, माझी उमेद, आशाआकांक्षा, स्वप्नं सारं काही बोगद्याच्या त्या कोपऱ्याने सांभाळलंय. या न्युयॉर्क शहराने मला उपाशी ठेवले नाही. पोट भरण्याइतपत रोजगार दिला पण त्या रोजगाराने घर भाडयाने घेण्याची ऐपत दिली नाही.' एवढयात नर्स आली व काही तपासणी करण्यासाठी जेसील घेऊन गेली. जेसीच्या परतण्याची वाट पाहणाऱ्या रिकीला मी अभिवादन करुन म्हटले, 'तुम्ही, तारा, जेसी, बोगदा, मम्मी, मांजरीची पिल्ले या सर्वांबद्दल मला इतके कुतूहल वाटू लागले आहे की तुमच्या खाजगी बाबतीत विचारण्याचा काही एक अधिकार नसताना धाडस करुन विचारावेसे वाटते की तुमची मम्मी जेसीला भेटायला न येता पार्कमध्ये का थांबली?'. बऱ्याच दिवसांनी आत्मीयतेने बोलणारे कुणीतरी भेटले म्हणून असेल रिकी मनमोकळे बोलू लागला. 'मम्मी हे मला रस्त्यावर सापडलेल्या कुत्रीचे मी ठेवलेले नाव आहे. कुत्र्यांना हॉस्पिटलमध्ये आणण्याची मनाई आहे म्हणून ती ताराजवळ पार्कमध्ये बसलीये. मम्मीने मला खरा भावनिक व मानसिक आधार दिला. तिच्या सोबतीने बोगद्यातील अंधारलेला, ओलसर, थंड कोपरा उजळला, उबदार वाटला. लोकांना वाटते सरकारी शेल्टर्सची सोय मिळणे हा त्यांना कायद्याने दिलेला अधिकार आहे. शेल्टर्सची सोय मिळावी म्हणून सरकारवर कोर्टात दावा लावणारे महाभाग आहेत, म्हणून शेल्टर्स आहेत. जुन्या इमारतीत कमीत कमी, सोयी असलेल्या शेल्टर्सच्या अस्वच्छ खोल्यांतुन उंदीर, झुरळाबरोबर गुन्हेगार, बेकार, व्यसनी, अंमली पदार्थांची नशा करणारे, समाजनियमांना, कायद्यांना धाब्यावर बसवून सरकारी छताखाली राजरोस गुन्हे करणारे व गरजूही नाईलाज म्हणून शेल्टर्समध्ये राहतात. मम्मी सापडली नव्हती तोपर्यंत मी देखील दोन –चार वेळा शेल्टर्समध्ये राहण्याचा प्रयत्न केला पण सतत जीवाच्या भीतीने सावध होऊन जगणे मला जमले नाही. शेवटी कंटाळून मी बोगद्यात आलो. न्यूयॉर्क शहराच्या खालून जाणाऱ्या या बोगद्यातून कधी काळी ट्रेन्स धावत असत. स्टेशनवर असणाऱ्या

सर्व सोयी तेथे होत्या. प्रकाश होता, पाणी होते, स्वच्छता होती, सभ्य माणसांचा वावर होता. स्टेशन बंद पडले, सर्व सोयी नष्ट झाल्या व बोगदा हळूहळू अंधारात लपून गेला. न्यूयॉर्क शहराखालून जाणारे असे काही बोगदे बंद पडले. आज जवळजवळ १५०० च्या आसपास बेघर अशा अंधाऱ्या बोगद्यांमध्ये राहतात. वीस वर्षांपूर्वी जेव्हा मी बोगद्याच्या अंधारलेल्या कोपऱ्यात माझे घर केले तेव्हा परिस्थिती बरी होती. ऊनपाऊस, बर्फापासून संरक्षण मिळे. थंडीच्या कडाक्यातही हे चिवट शरीर जगले. मम्मी सापडली, सोबत मिळाली. मम्मीची पिल्ले दत्तक घेणारे सहृदय लोकही भेटले. न्यूयॉर्क शहराच्या रोषणाईखाली, हजारो लाखो लोकांच्या पावलांखाली, हजारो ट्रेन्स, लाखो मोटारींच्या चाकांखाली शांत मनाने झोपत असे मी. सार्वजनिक आंघोळीच्या जागी आंघोळ, हॉटेलात जेवण, फक्त झोपण्यापुरता बोगद्यातील एक कोपरा सर्व सोईस्कर वाटत होता. आता सर्व बदलले आहे. आमचे बोगद्यातील सभ्य जीवन असभ्य बनत चाललंय. हे शहर कधी झोपत नाही, गुन्हयांचे प्रमाण वाढत आहे. व्यसनी, मानसिक व्याधींनी पछाडलेले, वेश्या यांची बोगद्यात वर्दळ वाढली आहे. ते तरी कुठे जाणार? परवाच पेपरमध्ये एक लेख वाचला. लेखाचे नाव होते 'Mole-people' त्यानुसार न्यूयॉर्क शहरात जवळजवळ नव्वद हजार बेघर लोक राहतात. त्यांपैकी चौदाशे भुयारी रेल्वेत मुक्काम ठोकून असतात. बस स्टेशन्स, रेल्वे स्टेशन्स, सेंट्रल पार्क, विमानतळ, सार्वजनिक उद्याने जमेल तेथे, मिळेल तेवढया जागेत हे बेघर लोक राहतात. आता जेसीचेच उदाहरण घ्या. पदवीधर, चांगली नोकरी असलेला तरुण कोणत्याही सोयी नसलेल्या बोगद्यात राहतोय. भरपूर ऑप्शन्स् व संधी उपलब्ध असलेल्या अतिप्रगत देशात जेसी, मी, तारा व आमच्यासारखे अनेक नाईलाज म्हणून बोगद्यात राहतात. विवाह, संसार, मुलेबाळे ही जागरहाटीतील सुखे आम्ही फक्त स्वप्नातच अनुभवतोय. आहे त्या पगारात अपार्टमेंटचे भाडे भरण्याची ऐपत नाही तर लग्न करुन जबाबदारी का वाढवायची? असाच गेले वीस वर्षे मी व्यवहारी विचार केला. जेसीला भेटायला येताच मी काय केले तर आंघोळ केली. ही साधी प्राथमिक गरज पूर्ण करायची सोय असणे हीदेखील माझ्याठायी चैनीची बाब बनावी ना? या खोलीतील स्वच्छ बिछाना, उबदार वातावरण, स्वच्छता, भरपूर प्रकाश, या सर्व गोष्टींचा मला या क्षणी हेवा वाटतोय. या सोयींसाठी जेसीला कॅन्सर व्हावा असे मला कधीही वाटले नव्हते, पण किमान तो तरी या किमान सोयींचा काही काळासाठी तरी उपभोग घेतो आहे याचे समाधाना वाटते मला. मेडिकल इन्श्युरन्स असूनदेखील जेसीला हॉस्पिटलचा खर्च भागविताना जीवाचा आटापिटा करावा लागतोय. आता तुम्हीच पाहा किमान सोयींसाठी म्हणजे अर्ध्या खोलीत एका खाटेवर चोवीस तास आराम करण्यासाठी फक्त खोलीचे भाडे म्हणून एक हजार डॉलर्स भरावे लागतात. या खर्चापायी अपार्टमेंट भाडयाने घेणे लांबणीवर पडते आहे. अपार्टमेंट घेणे हे स्वप्न प्रत्यक्षात आणू शकला नाही म्हणून कॅन्सरच्या वेदनांपेक्षा अधिक तळमळतोय जेसी. मला त्याची तगमग, तडफड दिसते. मी त्याला एवढेच सांगतो की येथे आहेस तोपर्यंत विश्रांती घे. मांजरीच्या पिलांबद्दल कुतूहल होते ना तुम्हाला? बोगद्यात उंदीर आहेत म्हणून जेसीने व ताराने मांजरे पाळली. तिचा परिवार वाढविला. त्यांच्या आवाजाच्या सोबतीने व चमकणाऱ्या डोळयांच्या प्रकाशात बोगद्यातील अंधार आम्हा तिघा मित्रांनी सुसह्य करुन घेतला. तुम्हाला सांगू, हल्ली तिथे फक्त झोपायला राहण्याचे गणित इतके सोपे राहिले नाही. हल्ली एक वेडा माणूस टॉर्च घेऊन बोगद्यात फिरतो व स्वतःला 'लॉर्ड ऑफ द टनेल' म्हणवितो. असुरक्षितता वाढते आहे.' एवढयात तपासणी करुन जेसी परतला व थकल्यासारखा बिछान्यावर बसला. जेसीचा हात हातात घेऊन भरल्या आवाजात रिकी म्हणाला, 'जेसी टेक केअर, फील बेटर, आय लव्ह यू. आता निघतो. नाहीतर पार्कमध्ये बसलेल्या तारावर कुणी ड्रग ॲडिक्ट हमला करायचा. तुझ्या डॉक्टरांच्या पत्त्यावर मी तुला नियमितपणे पत्र पाठवेन'. जेसीचा निरोप घेऊन रिकी जड पावलांनी लिफ्टकडे गेला.

जेसीने उशीवर डोके टेकले. भिंतीकडे तोंड केले. अंगावरची चादर डोक्यापर्यंत ओढून घेतली व थोडयाच वेळात त्याचे मुसमुसून रडणे मला ऐकू येऊ लागले. खिडकीतून बाहेर पाहिले. संध्याकाळ रात्रीच्या कुशीत शिरत होती. न्यूयॉर्क शहर लाखो दिव्यांच्या प्रकाशात न्हाऊन निघत होते. एरिक गाढ झोपला होता. जेसीच्या हुंदक्यांनी मला अस्वस्थ केले. त्याच्या बिछान्याजवळ जाऊन मी त्याच्या पाठीवर हात ठेवला. हळूहळू माझ्याकडे वळत त्याने माझे हात पकडले व माझ्या ओंजळीत तोंड लपवून तो हमसाहमशी रडू लागला. थोडया वेळाने ते असहाय्य, एकाकी हुंदके मौन झाले.

मी टॉवेल गरम पाण्यात भिजवून आणला, त्याचे तोंड पुसले. नर्सने आणून दिलेला जेवणाचा ट्रे त्याच्यावर ठेवला, आग्रहाने त्याला जेवू घातले. नर्स येऊन औषधाचा डोस देऊन गेली. १५–२० मिनिटे टी.व्ही. बघून तो निद्रेच्या अधीन झाला.

पाय मोकळे करावेत म्हणून मी वेटिंग रुमपर्यंत गेले. तेथे बसुन काही मासिके चाळली व पुनः एरिकच्या रुममध्ये आले. 'एरिक काही तास तरी असाच सलग झोपेल. टोव्हा काळजी करु नकोस' असे नर्सने येऊन सांगितले व झोपलेल्या जेसीला उठवून त्याचे टेम्परेचर घेतले. माझ्याकडे पहात गोड हास्य करीत जेसी म्हणाला, 'बघ, माझ्या बोगद्यातील अलिशान शयनगृहात कुणी येऊन माझी अशी झोपमोड केली नसती.' रिकीने बोगद्याबद्दल बरेच काही ऐकवले होते. अनेक विचारही मनात येत होते. या शहराखाली असे अनेक बोगदे असतील, त्या अंधाराच्या आश्रयाने अनेक बेघर राहत असतील याची मला कल्पनाही नव्हती. मी धीर करुन जेसीला म्हटले, 'जेसी, मला तुझ्या घराबद्दल काही सांगशील?' 'या कॉटखाली ठेवलेली सूटकेस उघडून माझ अल्बम काढ' तो म्हणाला. अल्बम काढून त्याच्या हातात देत मी त्याच्या कॉटजवळच खुर्चीवर बसले. अल्बममधील एक फोटो दाखवत तो मला म्हणाला, 'हे माझे घर व माझ्या शेजारी ताराचे घर'. बोगद्यात जाण्यासाठी कधी काळी सुस्थितीत असलेल्या पण आता पडझड झालेल्या जिन्याखाली साधारण ६ X १० एवढया जागेत कार्डबोर्ड, प्लॅस्टिक, पत्र्याचे तुकडे इत्यादींच्या सहाय्याने जेमतेम झोपता येईल व थोडेफार सामान ठेवता येईल अशी ती जागा म्हणजे त्याचे घर होते. दुसऱ्या फोटोत त्याच्या हरवलेल्या मांजरीचा फोटो होता. तिसऱ्या फोटोत मांजरीची सहा पिल्ले होती. फोटोकडे बोट दाखवीत जेसी म्हणाला, 'तारा, रिकी, रिकीची मम्मी व मांजरीची पिले हा माझा परिवार मित्र परिवार. या सूटकेसमधील सामान व कपडे ही माझी या जगातील मालमत्ता. मी. बी.ई. आहे. मला चांगली नोकरी व महागडा रोग माझ्या शरिरात ठाण मांडून बसलाय जो मला घेऊन जाणार आहे देवाघरी'. त्याला थांबवित मी म्हणाले, 'जेसी, अकरा वाजून गेलेत, तू विश्रांती घे.' 'नको ग, बोलू दे मला. तुला माहिती आहे, मला घशाचा कॅन्सर आहे. काही दिवसांनी माझे ऑपरेशन होईल त्यातच कदाचित माझा आवाज हरवेल असे डॉक्टरांना वाटते. तसे झालेच तर यंत्राच्या सहाय्याने मी बोलू शकेन पण भावनांच्या सर्व छटा व्यक्त करणारा माझा आवाज नसेल तो,' पुनः एकदा जेसीचे डोळे पाणावले. जेसी बोलत होता, 'तुला सांगू, या न्यूयॉर्क शहरात जगताना मी अनुभवले की इंग्रजी भाषेतील सर्वात महाग शब्द कोणता असेल तर तो शब्द आहे 'हॅलो', एखादयाला हॅलो म्हणताच अपेक्षांची चढती कमान आपोआप तयार होते. आज तुझ्याशी बोलताना मात्र खूप आत्मीयता वाटली. Thank you for your concern. Good Night. खूप बोलावेसे वाटते गं, पण अधिक बोललो तर कॅन्सरने वेडया झालेल्या पेशी वेदनांची घुंगरं बांधून थयथयाट करु लागतात. मेंदू बधीर होऊ लागतो. वेदना असहय होतात तेव्हा हंबरडा फोडावासा वाटतो पण वाटते एखादी नस तुटेल आणि संपेल सारे. बोगद्यातील अंधारात स्वतःच्या शरीराची, घरकुलाची दैन्यावस्था कधी जाणवलीच नाही

पण येथील प्रकाशात शरीराची झालेली वाताहत नजरेत भरते. माझ्या शरीराची चिरफाड सुसह्य व्हावी म्हणून प्रार्थना कर गं. इतका बोललो पण तुझे ना मुद्दाम विचारले नाही कारण यदाकदाचित भेटलीस तू तर यंत्राच्या सहाय्याने तुला हाक मारण्याची माझी तयारी नाही. तुझ्यातील आत्मीयतेला माझ्या खऱ्या आवाजाची सोबत मी देऊ शकलो, यातच मला मोठे समाधान आहे. आवाज हरवण्यापूर्वी मी माझ्या आवाजात बोलून तारासाठी टेप तयार करणार आहे. माझ्या आवाजात ती मला केव्हाही पाहू शकेल'. माझा हात हातात घेऊन धन्यवाद व्यक्त करीत जेसीने मनःपूर्वक हस्तांदोलन केले व बिछान्यावर अंग टाकले. डोळे मिटून 'गुडनाईट' म्हणत, कॉट, बिछाना, बिछान्यावरची पांढरीशुभ्र चादर, नरम उशी, उबदार ब्लँकेट व नाईट लँपच्या निळसर प्रकाशाचे सुख अनुभवत तो निद्रादेवीला बोलावू लागला. स्वतःच्या आवाजात.

एरिकच्या अंगावरचे पांघरुण सारखे करुन मी रुममधून बाहेर पडले. विचारांच्या ओघात लिफ्टमध्ये शिरले. एक बटन दाबले. लिफ्टने वेग घेतला, लिफ्ट थांबली, दरवाजा उघडला व मी बाहेर पाऊल टाकले. आजूबाजूला पाहिल्यावर लक्षात आले की नकळत मी हॉस्पिटलच्या टेरेसवर येऊन पोचले होते. इमर्जन्सीच्या वेळी डॉक्टरांना किंवा पेशंटना घेऊन येणाऱ्या हेलिकॉप्टरला उतरण्यासाठी तेथे हेलिपॅड होते. सहज माझी नजर आसमंताकडे गेली. न्यूयॉर्क शहर भरपूर प्रकाशात झगमगत होते. अॅटलांटिक समुद्राचे पाणी त्या प्रकाशात न्हाऊन निघत होते. पाण्यात दूरवर दिसत होता हातात ज्योत घेतलेला स्वतंत्रता देवतेचा पुतळा. स्वतंत्रता देवतेच्या हातातील ज्योतीच्या प्रकाशाकडे पहात माझी नजर जेसीच्या घरकुलाकडे झेपावली व बोगद्याच्या अंधारात हरवली. जेसी राहतो त्या बोगद्यामध्ये भावनांचा कल्लोळ इतका खच्चून भरला असेल असे मला कधीही वाटले नाही. मी विचार करीत होते, स्वातंत्र्य देवतेच्या हातातील ज्योतीचा प्रकाश कोणकोणते अंधार उजळणार आणि मला वाटू लागले सारे न्यूयॉर्क शहरच अवकाशाच्या बोगद्यामध्ये हरवले आहे.

**– डॉ. उषादेवी कोल्हटकर**

('खेळ भावनांचा' या कथासंग्रहातून)